# महाराष्ट्र विधानसभा

**दुसरे अधिवेशन, २०२४**

**सन २०२३-२४ च्या पुरवणी मागण्यांवरील**

**माननीय अध्यक्षांनी मान्य केलेल्या कपात सूचनांची यादी**

**मंगळवार दिनांक २७ फेब्रुवारी, २०२४**

## कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग

**कपात सूचनांची एकूण संख्या - ६**

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **पूरक मागणी क्रमांक: डी-३**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २४०१, पिक संवर्धन**<br>**बाब क्रमांक: ३४, रूपये:- २,०००/-**<br>**श्री. शिरीष चौधरी** |
| (१) | ६२५६ | १० | जळगांव जिल्हा हा देशातील केळीचा बालेकिल्ला आहे. साधारण एकूण ४९००० हेक्टर क्षेत्र केळी पिकाखाली आहे, अतिशय व्यवसायी पध्दतीने व आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने केळीची शेती केळी उत्पादक करीत आहेत. त्यामुळे गेल्या दोन वर्षात केळीची निर्यात सुध्दा वाढली आहे असे असतांना केळी उत्पादक अनेक समस्यांना तोंड देत आहेत व केळीचे पिक शाश्वत ठेवण्यासाठी अतिशय प्रगतशील आहे. परंतु नैसर्गिक समस्या व रोग-राई मुळे केळी उत्पादक मेटाकुटीस आला आहे. केळी संशोधन केंद्र जळगांव महात्मा फुले कृषी विद्यापीठांतर्गत केळी संशोधन केंद्र जळगांव गेल्या ७० वर्षांपासून अस्तित्वात आहे. हे संशोधन केंद्र जळगांव येथे आहे आणि केळीची मुख्य लागवड रावेर यावल, चोपडा, भुसावळ, मुक्ताईनगर, जामनेर या भागात आहे. जळगांव आणि चोपडा हे दोन तालुके कांदेबाग लागवड करतात. परंतु केळीची आधुनिक शेती व निर्यात रावेर व यावल तालुक्यातून जास्त प्रमाणात आहे. तसेच केळीवर आठ-दहा वर्षांपासून करपा, सी.एम्.व्ही. पिटींग, ग्रिप्स, थंड तापमान व उष्ण तापमानाचा परिणाम मोठ्या प्रमाणावर होत आहे. केळी पिकातील संशोधनासाठी पुरेशी सुविधा केळी संशोधन केंद्र जळगांव यांच्याकडे नाही. पुरेसे शास्रज्ञ नाही. प्रयोगशाळा नाही. संशोधनासाठी लागणारी यंत्रणा नाही. जमीन, पाणी मोठ्या प्रमाणात उपलब्ध नाही. शास्रज्ञांना केळी बागायतारांना मार्गदर्शन करण्यासाठी सुविधा नाही पर्यायाने केळी उत्पादकांच्या समस्या व शास्रज्ञ यांच्यात मोठा गॅप आहे. त्यासाठी आमची विनंती आहे की, केळी संशोधन केंद्र हे जळगांव वरून हलवून हिंगोणा ता. यावल येथे स्थलांतरित केले तर शेतकरी व शास्रज्ञ यांच्यात समन्वय व सहकार्य वाढेल. त्यासाठी लागणारी जमीन आम्ही उपलब्ध करून देवू परंतु राज्य सरकारने व केंद्र सरकारच्या आय. सी. ए. आर. ने आर्थिक मदत करत अत्यंत आधुनिक असे केंद्र उभे करावे जेणे करून केळीच्या अनेक समस्यांना आळा घालता येईल व ज्या केळीच्या पिकांवर अडीच ते तीन लाख लोकांना रोजगार मिळाला आहे आणि केळीमुळे सामाजिक व आर्थिक विकास घडून आला आहे त्याला शाश्वत ठेवण्यास मदत होईल. त्यामुळे शासनाने याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **पूरक मागणी क्रमांक: डी-४**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २४०३, पशुसंवर्धन**<br>**बाब क्रमांक: ३९, रूपये:- ४,०००/-**<br>**श्री. संजय जगताप** |
| (२) | ६२५९ | १० | राज्यातील शासकीय पशूवैद्यकीय रूग्णालयात जनावरांच्या (गायी, म्हैस, बैल) यांच्या लसीकरण व औषधांबरोबरच भटक्या कुत्रे, मांजर यांची संख्या वाढत असल्याने रेबिज, गॅस्ट्रो व इतर औषधे उपलब्ध करुन दयावी. तसेच पशूसंवर्धन विभागा कडून त्रेमासिक, सहामाहिती शिबिरे व मुंबई शहरात भटक्या कुत्र्यावर लसीकरण मोहीम घेण्याची आवश्यकता याबाबत करावयाची कार्यवाही. |
| (३) | ६२६० | १० | पुरंदर तालुक्यातील (जि.पुणे) दुष्काळामुळे जनावरांना चाऱ्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाल्याने पशूसंवर्धन विभागामार्फत उपाययोजना होणे गराजेचे असल्याने याबाबत तातडीने कार्यवाही करावी. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: डी-४**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २४०३, पशुसंवर्धन**<br>**बाब क्रमांक: ४०, रूपये:- ५,०००/-**<br>**श्री. नानाभाऊ पटोले** |
| (४) | ६२३७ | १० | भंडारा जिल्ह्यात साकोली, लाखनी व लाखांदूर तालुक्यात पशुवैद्यकिय दवाखान्याच्या स्वतंत्र ईमारती उपलब्ध नसणे, पशुवैद्यकिय व कर्मचाऱ्यांची पदे रिक्त असणे, त्यामुळे जनावरांवर रोग प्रतिबंधक उपाययोजना करण्यास अडचण निर्माण होणे, पशुपालकांच्या दारात जनावरांना सखोल वैद्यकीय सेवा मिळावी आणि पशुपालकांमध्ये पशुसंवर्धनाबाबत जागरुकता वाढावी, जनावरांचे आजार ओळखावेत आणि लसीकरण व्हावे यासाठी गावपातळीवर पशु आरोग्य शिबिरांचे आयोजन न होणे, साकोली, लाखनी व लाखांदूर तालुक्यात अत्याधुनिक मत्स्य बिज केंद्र व प्रशिक्षण केंद्र उपलब्ध नसणे, त्यामुळे शहरी व ग्रामीण भागातील मश्चिमार बांधव हे विविध योजनेंपासून वंचित असणे, तालुका स्तरावर शासकीय दुग्ध संकलन केंद्र उपलब्ध नसणे, त्यामुळे दुग्ध उत्पादक शेतकऱ्यांना आर्थिक नुकसान होणे, त्यामुळे शासनाने याबाबत करावयाची कार्यवाही व राज्यशासनाची प्रतिक्रिया. |
| | | | **श्री. विजय वडेट्टीवार** |
| (५) | ६२६८ | १० | राज्यात सन २०२३-२०२४ या वर्षात राजे यशवंतराव होळकर महामेष योजनेअंतर्गत मेंढी पालनासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत तसेच महाराष्ट्र मेंढी व शेळी सहकार विकास महामंडळाची स्थापना करण्याबाबतची मागणी माहे फेब्रुवारी २०२४ मध्ये वा त्या दरम्यान लेखी निवेदनाव्दारे मा. पशुसंवर्धन मंत्री यांच्याकडे केलेली असणे, राज्यात मेंढी व शेळी पालन करणाऱ्या मेंढपाळ समाजातील नागरिकांचा दर्जा वाढ त्यांना विकासाच्या मूळ प्रवाहात आणण्यासाठी शासनामार्फत तातडीने मेंढी व शेळी सहकार विकास महामंडळाची स्थापना करुन |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | त्यास निधी उपलब्ध करण्याची आवश्यकता असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही वा उपाययोजना. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: डी-५**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २४०४, दुग्धव्यवसाय विकास**<br>**बाब क्रमांक: ४२, रूपये:- २,०४,७६,३५,०००/-**<br>**श्री. विजय वडेट्टीवार** |
| (६) | ६२७२ | १० | राज्यातील महानंद ही सर्व दूध संघांची शिखर संस्था असतांनाही संघांचे स्वतंत्र अस्तित्व असतांनाही महानंद दूध संघाचे पुनरुज्जीवन करण्याकरिता राष्ट्रीय डेअरी विकास बोर्डाकडे (एनडीडीबी) देण्याबाबतची प्रकिया सुरु असल्याचे व्यवस्थापकीय संचालक, महानंद यांनी घोषणा केलेली असणे, महानंद चे हस्तांतरण न करता राज्य शासनाने आर्थिक पाठबल देण्याची आवश्यकता असणे, यामुळे राज्यातील शेतकऱ्यांना दुग्धव्यवसायाकडे वळविण्याकरिता गाई, म्हैस खरेदी करण्याकरिता भरीव अनुदान देण्याची आवश्यकता असणे, याकडे शासनाचे दुर्लक्ष झाले असल्यामुळे शासनाने यासंदर्भात करावयाची कार्यवाही वा उपाययोजना |

**विधान भवन**
**मुंबई,**
**दिनांक : २७ फेब्रुवारी, २०२४**

**जितेंद्र भोळे,**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा**

**याची प्रत :**

(१) मंत्री व राज्यमंत्री
(२) विधानसभेचे सर्व सदस्य.
(३) कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग (१० प्रती)
(४) संसदीय कार्य विभाग.
(५) वित्त विभाग.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई